वर्ष : ०४ | अंक: १८ | मुंबई, मंगळवार २७ मार्च २०१८ ते २ एप्रिल २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र


पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 खादीचे प्रोत्साहन धोरण केवळ कागदावर

3 → उशिराने आलेले शहाणपण

अण्णांनी भेट नाकारली; भाजपाची डोकेदुखी वाढली ← 4




# मिरा भाईंदर वाहतुक पोलिसांची धडक कारवाई



## यामध्ये पकडलेल्या दुचाकी, चारचाकी वाहनांचा खच पडून



**भाईंदर (प्रतिनिधी)- अलीकडे मिरा-भाईंदरमध्ये दुचाकी वाह चालकांचा ठिकठिकाणी नियमाचे उल्लंघन करून वेगाची मर्यादा न बाळगता सुसाट वेगाने दुचाकी स्वार वावरताना दिसतात. यामध्ये १६ ते ३० या वयोगटातील तरुण तरुणी जास्त प्रमाणात आढळतात. यामुळे मिरा-भाईंदर पूर्व, पश्चिम वाहतुक विभागाने ठिकठिकाणी नाकाबंदी करून डोक्यावर हेल्मेट नाही, गाडीचे कागदपत्रे नाहीत त्याप्रमाणे २ पेक्षा अधिक जास्त माणसे बसणे, वेगाची मर्यादा न बाळगणे अशा दुचाकी स्वारांवर कारवाई करण्यात आली. दुचाकी स्वार मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदुषण स्वारांवर कारवाई करण्यात आली.**

उर्वरित पृष्ठ 2 वर

# भाईंदर महापालिकेच्या आरक्षणांचा विकास ब्रिटीशकालीन कंपनीच्या वादामुळे अडकला

***मीरारोड- गेल्या १४० हून अधिक वर्षांपासून भाईंदरकरांच्या मानगुटीवर दी-इस्टेट इन्व्हेस्टमेंट या ब्रिटीशकालीन कंपनीचे भूत बसले असताना त्यात आता पालिकेच्या आरक्षणांवरील (नागरी सुविधा भूखंड) विकास लटकला आहे. सध्या कंपनीच्या मालकीचा वाद न्यायप्रविष्ट असला तरी, त्याचा फटका पालिका आरक्षणाच्या विकासाला बसला आहे. हा मुद्दा निकाली काढण्यासाठी पालिका न्यायालयात प्रतिवादी झाल्याची माहिती विधी अधिकारी सई वडके यांनी दिली.***



भारताला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाल्यानंतरही मीरा-भाईंदर शहरातील ३ हजार ६९९ एकर जमिनीच्या सातबाऱ्यावर तत्कालिन जिल्हाधिकारी मधुकर झेंडे यांनी ५ सप्टेंबर २००८ रोजी दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट या ब्रिटीशकालिन कंपनीचे नाव चढविले. सध्या या कंपनीची देखभाल एका बड्या बिल्डरकडून करण्यात येत आहे. या कंपनीची मालकी कागदोपत्री असल्याने त्या जमिनींवर झालेला कामांचा पुनर्विकास करण्यासाठी कंपनीचा ना हरकत दाखला अनिवार्य करण्यात आला आहे. यामुळे पालिकेलाही येथे कोणत्याही प्रकारचे काम करणे अवघड झाले आहे. दरम्यान या कंपनीच्या जागा मालकीविरोधात २०१५ मध्ये कोकण विभागीय आयुक्तांकडे दावा दाखल करण्यात आला. त्यावर ७ जुलै २०१५ रोजी पार पडलेल्या सुनावणीत विभागीय आयुक्तांनी आदेशाला स्थगिती दिल्याने सुमारे ३ हजार ६९९ एक जागेवरील विकासाचा मार्ग मोकळा झाला होता. मात्र कंपनीने विभागीय आयुक्तांच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेत स्थगिती आदेश मिळविला. यामुळे कंपनीची मालकी असलेल्या जागेवरील विकास पुन्हा ठप्प झाला असला तरी, ज्या जागेवरील विकासासाठी कंपनीने यापूर्वीच ना हरकत दाखला दिला आहे. अशा जागांचा विकास करण्यास मात्र मुभा दिल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र उर्वरित जागांवरील विकास अद्याप अडकला आहे.

# सावधान! मिनरल वॉटरच्या नावाखाली विकलं जातंय दुषित पाणी

उन्हाळा सुरू झालाय. तुमच्यापैकी बरेच जण मिनरल वॉटर म्हणून ओळखलं जाणारं बाटलीबंद पाणी विकत घेत असाल. मात्र पैसे मोजून तुम्हाला प्युरीफाईड नव्हे तर दूषित पाणी विकलं जात आहे. ब्रँडेड कंपनीचं लेबल लावून दूषित पाण्याचा धंदा करणाऱ्या कंपन्यांचा पर्दाफाश झालाय.

बाटलीबंद पाणी पीणं हे कधीकाळी समाजात स्टेटस होतं पण आज ती गरज बनलीय. उन्हाळ्यात तुम्ही बाटलीबंद पाणी पित असाल तर तुमच्या आरोग्याशी खेळ केला जातोय. ब्रँडेड कंपन्यांची लेबल वापरून पाण्याचा सुरु असलेला हा काळाबाजार पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात राजरोसपणे सुरु होता. याची माहिती मिळताच पुणे इउँ अर्थात अन्न आणि औषध विभागानं धडक कारवाई केलीय. राज्यात बाटलीबंद पाण्याचे हजारो कारखाने उभे आहेत. हे कारखाने सर्वसामान्यांनाकडून पैसे उकळून त्यांच्याच आरोग्याशी खेळ खेळला जातोय. अशावेळी एफडीएची भूमिका महत्वाची आहे. हा गंभीर प्रकार थांबला नाहीतर सर्वसामान्यांना पैसे देवून काळ्यापाण्याची शिक्षा भोगावी लागू शकते.



# कागदी उंदरांनी केली सरकारी तिजोरी भुसभुशीत



**मुंबई- बिहारमधील चारा घोटाळा व महाराष्ट्रातील उंदीर घोटाळा यात साम्य आहे काय हे आता पारदर्शक सरकारच्या पहारेकऱ्यांनी शोधायचे असून अस्तित्वात नसलेल्या मजूर संस्थेला कंत्राट कसे दिले गेले?, असा सवाल शिवसेनेने विचारला आहे. 'डिजिटल इंडिया', 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' किंवा 'स्टार्ट अप इंडिया'च्या काळात सरकारवर फायलींचे रक्षण करण्यासाठी उंदीर मारण्याची वेळ यावी हे चमत्कारिक वाटते. मंत्रालयातील कागदी उंदरांनी सरकारी तिजोरी भुसभुशीत केली, असा टोलाही शिवसेनेने लगावला.**

उंदीर घोटाळ्यावरुन शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'च्या अग्रलेखातून सोमवारी पुन्हा एकदा भाजपावर टीका करण्यात आली आहे. एकनाथ खडसे यांनी उंदीर घोटाळा बाहेर काढताच अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ईश्वरास साकडे घातले की 'साईबाबा खडसे यांना सुबुद्धी देवो'. म्हणजे खडसे यांची मती भ्रष्ट झाली आहे असे सरकारला म्हणायचे आहे का?, असा सवाल शिवसेनेने विचारला.

देशात चारा घोटाळाही होऊ शकतो हे लालूप्रसाद यादव यांच्यामुळे समोर आले. पाणा



महाराष्ट्रातील उंदीर घोटाळा हा 'चारा' घोटाळ्यावर मात करणारा आहे. उंदीर घोटाळ्यातील नवे कंगोरे रोज बाहेर येत आहेत. चारा घोटाळ्यात लालूंना शिक्षा झाली तशी शिक्षा उंदीर घोटाळा करणाऱ्यांना होईल का?, असा प्रश्न विचारत शिवसेनेने भाजपाची कोंडी केली. डिजिटल इंडियाच्या जाहिरातींवर शेकडो कोटी खर्च झाले, पण तो भंपकपणा होता हे राज्याच्या मंत्रालयातील साडेतीन लाख उंदरांनी दाखवून दिले, असे शिवसेनेने म्हटले आहे.

मंत्रालयातील उंदीर मारण्याचे कंत्राट विनायक मजूर सहकारी संस्थेस मिळाल्याचे कागदोपत्री दिसत आहे, पण ही विनायक मजूर संस्था अस्तित्वातच नाही. बंद पडलेल्या विनायक मजूर संस्थेस हे उंदीर संहाराचे कंत्राट कसे मिळाले, असा प्रश्न भाजपाला विचारण्यात आला आहे. भ्रष्टाचार कितीचाही असो, नीरव मोदीप्रमाणे अकरा हजार कोटींचा असो किंवा एक रुपयाचा. जनतेच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना मोकळे रान मिळता कामा नये, अशी मागणी शिवसेनेने केली आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




# राम नवमीच्या रॅलीत तलवारी नाचवल्या

**कोलकाता: देशभरात रामनवमी धुमधडाक्यात साजरी होत असताना पश्चिम बंगालमध्ये मात्र दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे. पुरुलिया येथे बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी 'जय श्रीराम'चे नारे देत नंग्या तलवारी नाचवतंच रामनवमीच्या मिरवणुकीत भाग घेतला. सिलिगुडीतही मिरवणुकांमध्ये नंग्या तलवारी नाचवण्यात आल्या. त्यामुळे पुरुलिया आणि सिलिगुडी परिसरात प्रचंड दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे.**




पुरुलिया येथील रामनवमीच्या रॅलीला प्रशासनाची परवानगी नव्हती. तरीही बजरंग दलाने रॅली काढल्याचं सूत्रांनी सांगितलं. त्याआधी शनिवारी रात्री वर्धमान जिल्ह्यात भाजप कार्यकर्त्यांनी उभारलेल्या रामनवमीच्या मंडपात काही लोकांनी घुसून हल्ला चढवला. त्यात चारजण जखमी झाले होते. या हल्ल्यामागे तृणमूल काँग्रेसचा हात असल्याचा आरोप भाजपने केला आहे. दरम्यान, पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे.

दोन दिवसांपूर्वीच भाजपचे प्रदेश प्रभारी दिलीप घोष यांनी रामनवमीच्या मिरवणुकांमध्ये पारंपरिक शस्त्रे असतील असं सांगितलं होतं. मात्र किती प्रमाणात शस्त्रे आणण्यात येईल हे त्यांनी सांगितलं नव्हतं. प्रशासनाने या मिरवणुका अडवण्याचा प्रयत्न केला तर त्याला हिंसक वळण लागू शकते, असा इशाराही त्यांनी दिला होता. तर दुसरीकडे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मिरवणुकांमध्ये शस्त्रे आणण्यास मनाई केली होती. तरीही मिरवणुकांमध्ये तलवारी आणण्यात आल्याने या भागात तणावाचे वातावरण आहे.

# भांडुपमध्ये आठवडाभरात पाच जणांची हत्या

**मुंबई** - भांडुपमध्ये रविवारी पहाटे आणखी एका तरुणाची हत्या झाल्याचे उघडकीस आल्यानंतर परिसरामध्ये दहशतीचे वातावरण आहे. आठवडाभरातील भांडुपमधील ही पाचवी हत्या असून या व्यतिरिक्त दोन जणांवर प्राणघातक हल्ला झाल्याचेही उघडकीस आले आहे.

रविवारी पहाटे नरेश शेट्टी या तरुणाची रिक्षामध्ये हत्या करण्यात आली, तर शुक्रवारी रामजी राजभर याचा खून झाला. गेल्या रविवारी भांडुपमध्ये भाजीची गाडी लावण्यावरून झालेल्या भांडणातून गुलाम अली खान, त्यांचा मुलगा शेहबाज आणि शादाब यांची हत्या करण्यात आली. ही घटना ताजी असतानाच शुक्रवारी रामजी राजभर (२७) याची क्षुल्लक वादातून हत्या करण्यात आली. सिगारेटचा धूर तोंडावर सोडल्याने एका तरुणाने रामजी याच्यावर धारदार चाकूने वार केले. भांडुपकर या हत्यांच्या घटनांमधून सावरत असतानाच रविवारी सकाळी नरेश शेट्टी याचा मृतदेह भांडुपमध्ये एका रिक्षात आढळला. त्याचीही चाकूने हत्या करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात दोन तरुणांवर तलवारीने प्राणघातक हल्लेही करण्यात आले. याप्रकरणी भांडुप पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.



# राज्यात प्लास्टिक संभ्रम

## नेमकी बंदी कशावर, याबाबत विक्रेतेही पेचात, विल्हेवाटीसाठी महिनाभराची मुदत



**मुंबई** - प्लास्टिक बंदीची अधिसूचना निघाल्यापासून म्हणजे शुक्रवारपासून राज्यात प्लास्टिक बंदी लागू झाली असली, तरी नेमक्या कोणत्या वस्तूंवर बंदी आहे आणि कोणत्या वस्तूंवर नाही, याबाबत विक्रेते आणि सर्वसामान्य नागरिकांत मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. दुधाच्या पिशव्या आणि पाण्याच्या बाटल्यांसाठी ५० पैशांपासून दोन रुपयांपर्यंत परताव्याची हमी असलेली अतिरिक्त रक्कम सामान्यांना भरावी लागणार असली तरी त्याचा हिशेब कसा ठेवायचा, याचाही संभ्रम विक्रेत्यांमध्ये आहे. अधिसूचनेच्या सरकारी भाषेने बंदीची नेमकी व्याप्ती स्पष्ट होत नसल्याने आणि बंदी मोडल्यास पाच हजार रुपयांपासून २५ हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद असल्याने सामान्य माणूस अधिकच गोंधळला आहे.

या बंदीमुळे ५०० मिलिपेक्षा कमी पाण्याच्या सर्व बाटल्यांवर बंदी आली आहे. ५०० मिलिच्या बाटलीसाठी एक रुपया, तर एक लिटर पाण्याच्या बाटलीसाठी दोन रुपये विक्रेत्याला अतिरिक्त द्यावे लागणार आहेत. रिकामी बाटली परत केल्यावर ते परत दिले जाणार आहेत. रिकामी बाटली परत घेऊन अतिरिक्त रक्कम देणे विक्रेत्यांवर बंधनकारक आहे. मात्र याबाबतही गोंधळाचे वातावरण आहे. समजा एखाद्याने प्रवासात पुण्यात बाटली विकत घेतली आणि तो मुंबईला गेला, तर ती बाटली कोणाला द्यायची, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. जी बाटली आपण विकली नाही, ती विक्रेता परत का घेईल आणि त्याने घेतली नाही, तर त्या बाटली कचऱ्यात जाऊन सामान्य माणसाचे दोन रुपयेच वाया जाणार नाहीत का, याबाबतही स्पष्टता नाही.

विशेष म्हणजे मोठ्या बाटल्यांना आता सूट असली, तरी तीन महिन्यांनंतर त्यांच्यावरही बंदी आणली जाणार आहे, असे पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले. ज्यांच्याकडे थर्माकोल आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा साठा आहे त्यांनी मागणी केल्यास काही कालावधी वाढवून देण्यात येणार आहे. या उद्योगात काम करणाऱ्या हजारो कामगारांचाही सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येणार असून त्यांचाही रोजगाराचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे कदम यांनी सांगितले. प्लास्टिक पिशव्यांना पर्याय देण्यासाठी महिला बचतगटांमार्फत कापडी पिशव्यांचे उत्पादन सुरू केले आहे. त्यांना पाच कोटी रुपये देण्यात आले आहेत. लवकरच कापडी पिशव्या बाजारात येणार आहेत. नाविन्यपूर्ण योजनेतून प्रत्येक पालकमंत्र्यांनी काही निधी कापडी पिशवी बनविण्यासाठी बचतगटांना देण्याबाबत सांगितले आहे, अशी माहिती कदम यांनी दिली.

बंदी लागू झाल्यापासून तत्काळ या वस्तूंच्या विक्री, वापर आणि वितरणावर बंदी आली आहे. मात्र विक्रेते आणि सर्वसामान्य नागरिक यांना त्यांच्याकडे असलेल्या प्लास्टिक वस्तूंच्या विल्हेवाटीसाठी एक महिन्याचा अवधी देण्यात आला आहे. या वस्तू परत घेण्यासाठी केंद्रे उघडली जाणार आहेत, असेही सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले, तरी अजून असे एकही केंद्र सुरू झालेले नाही. त्यामुळे ती केंद्रे सुरू झाल्यानंतर महिन्याची मुदत कशी पूर्ण करता येणार, अशी चिंताही सामान्यांना भेडसावत आहे.

एकदा वापर करून फेकले जाणारे प्लास्टिक आणि प्लास्टिक वस्तू बंदीच्या कक्षेत आहेत. मग 'यूज अॅण्ड थ्रो' (वापरा आणि फेका) पेनांवरही बंदी आहे का, असा प्रश्न विक्रेते आणि ग्राहकांना पडला आहे. हँडल असलेल्या आणि नसलेल्या अशा सर्व पिशव्यांवर बंदी असल्याचे अधिसूचनेत म्हटले आहे त्यामुळे साडी, कपडे यांच्या दुकानातील जाड प्लास्टिक पिशव्याही बंदीच्या कक्षेत आल्या आहेत का, असा प्रश्न सामान्यांना पडला आहे.

# खादीचे प्रोत्साहन धोरण केवळ कागदावर

**मुंबई** - केंद्र सरकारकडून खादी लोकप्रिय होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गतवर्षी त्याच प्रोत्साहन धोरणाशी सुसंगत असा निर्णय एसटी महामंडळाने घेतला होता. खादीचा प्रसार होण्यासाठी महामंडळाने अधिकारी-कर्मचाऱ्यांना आठवड्यातून एकदा तरी खादीचा गणवेश वापरण्याचे आवाहन केले होते. पण संपूर्ण महामंडळातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्याची अमलबजावणी केलेली नाही.

एसटी महामंडळाने गेल्यावर्षी परिपत्रक काढून एसटी अधिकारी-कर्मचाऱ्यांना खादीचे गणवेश वापरण्याचे आवाहन केले होते. मात्र हा केवळ ऐच्छिक भाग असून त्यासाठी सक्ती नसल्याचेही स्पष्ट केले होते. त्याचप्रमाणेच खादीच्या गणवेशांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नसल्याचेही नमूद होते. मात्र, महामंडळातील जवळपास सर्वच अधिकारी कर्मचाऱ्यांनी खादी वापराचे आवाहन गांभीर्याने घेतलेले नाही.

केंद्र सरकारने गेल्यावर्षी खादी व ग्रामोद्योगाला चालना देण्यासाठी सर्व सरकारी, निमसरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्थांमध्ये ऐच्छिक स्वरूपात आठवड्यातून एक दिवस खादीचे कपडे परिधान करण्याचे आवाहन केले होते. त्यास अनुसरून महामंडळाने परिपत्रक काढले होते. मात्र नव्याने गणवेश घेण्यासाठी कोणताही भत्ता वा तरतूद नसल्याने त्याची अमलबजावणी झाली नसल्याचे सांगण्यात येते. नेहमीच्या वापरातील गणवेश परिधान



करून ड्युटी करणे सोयीचे असतानाच नव्याने खादीचा गणवेश शिवून घेण्यास नापसंती आहे. खादी महाग असून ते परवडणारे नसल्याचेही सर्वसामान्य कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे इच्छा असूनही खादीचा गणवेश वापरणे कठीण असल्याचे कर्मचारी सांगतात.

# अंगणवाडी सेविकांना पूर्ण न्याय मिळेपर्यंत लढणारच



अंगणवाडी सेविकांनी दिलेला लढा कौतुकास्पद असून 'मेस्मा'ला स्थगिती मिळाली तरी शिवसेना समाधानी नाही. अंगणवाडी सेविकांना पूर्ण न्याय मिळेपर्यंत लढाई सुरू राहील, असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी सांगितले. सत्तेवर बसलेले पावटे बदलायची गरज आहे, असा हल्लाही ठाकरे यांनी भाजपवर चढवला.

उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना आमदारांनी मेस्माविरोधात आक्रमक भूमिका घेत विधिमंडळाचे कामकाज बंद पाडले. त्या दबावामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेस्माला स्थगिती दिली. याबद्दल आभार मानण्यासाठी अंगणवाडी सेविकांनी शुक्रवारी दुपारी १२ वाजता शिवसेना भवन येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यावेळी बोलताना ठाकरे म्हणाले, अंगणवाडी सेविकांचा लढा मोठा आहे. मेस्माला स्थगिती मिळाली असली तरी अजून मी समाधानी नाही. जोवर पूर्ण न्याय मिळत नाही तोवर लढा सुरूच ठेवणार आहोत. शायनिंग इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया हे केवळ बोलून चालत नाही.

अंगणवाडी सेविका जे करत आहेत तो खरा स्टार्ट अप आहे. अंगणवाडी सेविकांना सेनेने जी मदत केली ती राजकीय श्रेयासाठी नव्हती. तुम्ही कोणासोबत जायचे हे तुम्ही ठरवा, असे ते म्हणाले. लालबावटा आणि शिवसेनेचे नाते जगजाहीर आहे. शिवसेना सर्व काही उघड करते. शेतकरी आंदोलनालाही पाठिंबा दिला. लाल बावटा घेऊन जो शेतकरी आला तो रक्ताने लाल झाला त्याचा हा लाल बावटा, असे उद्गार उद्धव यांनी काढले.

# मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन होणारच

**कोणाचाही कितीही विरोध असला तरी महाराष्ट्राच्या विकासासाठी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन होणारच, अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधान परिषदेत मांडली. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी गुजरात मध्ये आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र सुरु करण्यात येत असल्याचे जाहीर केले असले तरी, मुंबईतही वित्तीय सेवा केंद्र उभारणारच, अशी ग्वाही दिली.**



काँग्रेसचे संजय दत्त यांनी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन आणि मुंबईत होऊ घातलेले आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. बुलेट ट्रेनचा जास्त फायदा गुजरातला होणार आहे. तर मग त्याचा समान आर्थिक भार महाराष्ट्राने का उचलायचा, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. वाढत्या गर्दीमुळे उपनगरी रेल्वेतून पडून वर्षाला साडे सहा हजार निरपराध प्रवाशांचा बळी जातो, ती उपनगरी रेल्वे सुधारण्यासाठी सरकार काही करत नाही, मात्र बुलेट ट्रेनवर ३३ हजार कोटी रुपये खर्च करायला निघाले आहे, अशी टीका भाई जगताप यांनी केली.

मुख्यमंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेवर आणि त्यासंदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नांवर राज्य सरकारची भूमिका मांडली. बुलेट ट्रेन या प्रकल्पामुळे ३३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात होणार आहे. जपानकडून ५० वर्षांच्या मुदतीसाठी एक लाख कोटी रुपये फक्त अर्धा टक्का व्याज दराने मिळणार आहे. वीस वर्षे एक पैसाही द्यायचा नाही, त्यानंतर त्याची परतफेड करायची आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यात ३३ हजार कोटी रुपयांची त्यात गुंतवणूक होणार आहे. त्यातून राज्याचा विकास होईस असे त्यांनी सांगितले.

हा करार मनमोहन सिंग-मोदी यांच्यातील मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनबाबतचा पहिला सामंजस्य करार २०१२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि त्यावेळी गुजरातचे मुख्यंमत्री असलेले नरेंद्र मोदी यांच्यामध्ये झाल्याचे सांगून मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस सदस्यांची विरोधाची धार बोथट केली.

# 'एक KISS दे, परीक्षेत चांगले गुण देईन'; *शिक्षकाची विचित्र मागणी*



**मुंबईत एका शिक्षकाने अकरावीमध्ये शिकणा-या विद्यार्थिनिला अश्लिल मागणी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. 'किस कर त्या बदल्यात मी परीक्षेमध्ये तूला चांगले गुण देईन' अशी मागणी या शिक्षकाने विद्यार्थिनीकडे केली होती. या प्रकरणी घाटकोपर पोलिसांनी ३५ वर्षीय शिक्षकाविरोधात पॉस्को कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.**

८ मार्च रोजी ही घटना घडल्याची माहिती आहे. कॉलेजच्या इंटर्नल परीक्षेमध्ये मला कमी गुण का मिळाले याचं कारण विचारण्यासाठी पीडित विद्यार्थिनी आरोपी शिक्षकाकडे गेली होती. त्यावर, जर जास्त गुण हवे असतील तर मला एक किस कर अशी अजब मागणी या शिक्षकाने तिच्याकडे केली.

अशा प्रकारच्या विचित्र मागणीमुळे विद्यार्थिनी दबावात होती. मुलीच्या स्वभावातला बदल तिच्या कुटुंबियांनी ओळखला आणि त्यामागचं कारण त्यांनी विद्यार्थिनीला विचारलं. अनेकदा कारण विचारल्यानंतर तिने रडत-रडत शिक्षकाने केलेल्या मागणीबाबत कुटुंबियांना सांगितलं. त्यानंतर तिच्या कुटुंबियांनी थेट कॉलेज गाठलं. तेथून आरोपी शिक्षकाला पोलीस स्थानकात घेऊन गेले व त्याच्याविरोधात सध्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर शिक्षक गेल्या १३ वर्षांपासून त्या शाळेमध्ये कार्यरत असल्याची माहिती आहे.

# सरकारी वसाहतींची कचरापट्टी



वारंवार सूचना देऊनही राज्य-केंद्र सरकारचे अधिकारी-कर्मचारी राहत असलेल्या वसाहतींमध्ये कचरा व्यवस्थापनासाठी कोणतेही पाऊल उचलले न गेल्याने अखेर महापालिकेने गेले चार दिवस या वांद्रे येथील शासकीय वसाहत, पोलीस वसाहत आणि सांताक्रूझ येथील एअर इंडिया वसाहतीमधील कचरा उचलणे बंद केले आहे. मात्र याचा त्रास वसाहतींसोबतच आजूबाजूच्या परिसरालाही होत असून शासकीय वसाहतीतील ३३४ इमारतींच्या साडेचार हजार घरांमधून गोळा करण्यात आलेला कचरा बाहेरच्या रस्त्यांवर ठिकठिकाणी पडला आहे. त्याच्या दुरुगधीने पादचारी, प्रवासी व समोरच्या वस्तीतील माणसांना त्रास होत आहे.


राज्य सरकारचे प्रथम श्रेणीतील अधिकारी व चौथ्या श्रेणीतील कर्मचारी यांची घरे असलेल्या वांद्रे शासकीय वसाहतीत ३३४ इमारतींमधील साडेचार हजार घरांमधून कचरा गोळा केला जातो व तो वसाहतीबाहेरील रस्त्यांवर कचराकुंडीत टाकला जातो. तेथून पालिकेच्या गाड्या तो कचरा उचलून नेतात. मात्र गेले चार दिवस कचरा उचलण्यात आलेला नाही. त्यामुळे कचरा सडत असून त्याला दुरुगधी सुटली आहे. वसाहतीपेक्षा या कचऱ्याचा त्रास आजूबाजूच्या परिसरातील रहिवासी व व्यावसायिकांना होत आहे.

# मुंबईतून दररोज सरासरी आठ वाहनांची चोरी

वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे एकीकडे वाहतूक कोंडी आणि वाहनतळ टंचाई या समस्यांना तोंड देणाऱ्या मुंबईकरांसमोर वाहनांच्या सुरक्षेचाही प्रश्न उभा ठाकत आहे. मुंबईमध्ये गेल्या दोन वर्षांत सहा हजारांहून अधिक वाहनांची चोरी झाली असून हा आकडा पाहता शहरातून दररोज सरासरी आठ वाहने चोरीला जात असल्याचे दिसून येत आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे, वाहनचोरीचा वेग वाढला असला तरी, त्यांचा छडा लावण्यात पोलिसांना मात्र वेग पकडता आलेला नाही. त्यामुळे चोरीला गेलेल्या सहा हजार वाहनांपैकी अवघ्या १८०० वाहनांचा छडा लावता आला आहे.

मुंबईत वाहनतळांचा प्रश्न गंभीर आहे. अनेक इमारतींमध्ये घरांच्या संख्येइतकी वाहनांच्या पार्किंगची जागा नाही. नाइलाजाने अनेकांना आपली वाहने इमारतीबाहेरील रस्त्याच्या कडेला उभी करावी लागतात. याचाच गैरफायदा चोरट्यांकडून घेण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी सुरक्षा यंत्रणा नसलेल्या अथवा सुरक्षारक्षकाचा पहारा नसलेल्या ठिकाणची वाहने हेरून पळवून नेण्याचे प्रकार वाढत चालले आहेत. गेल्या दोन वर्षांतील वाहनचोरीची आकडेवारी पाहता ही बाब अधोरेखित होते. मानखुर्दमधील माहिती अधिकार कार्यकर्ता शकील अहमद शेख यांनी मुंबई पोलीस विभागाकडे १ जानेवारी २०१६ पासून ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत मुंबईतील किती वाहनांची चोरी झाली. तसेच त्यांची किंमत काय होती आणि किती वाहनांचा शोध मुंबई पोलिसांनी लावला आहे, याबाबत माहिती विचारली होती.

मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मुंबई शहर आणि उपनगरातून १ जानेवारी २०१६ पासून ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत ३११८ वाहने चोरी झाली होती. यातील केवळ ८६१ वाहनांचा पोलिसांना शोध लावण्यात यश आले आहे. तर १ जानेवारी २०१७ पासून २० डिसेंबर २०१७ पर्यंत एकूण ३०१२ वाहनांची चोरी झाली. यांपैकीही केवळ ९३५ वाहनांचा शोध लावण्यात आला आहे.



# मुंबईत क्षयरोग फोफावतोय!

राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिका यांच्याकडून क्षयरोग निर्मूलनासाठी विविध उपक्रम राबविले जात असताना मात्र मुंबईतील क्षयरोग चांगलाच फोफावत आहे. मुंबईतील क्षयरोगाच्या रुग्णांची संख्या सुमारे ४५ हजारांवर पोहोचली असून २०१७ मध्ये काही औषधांना दाद न देणाऱ्या (एमडीआर) क्षयरोगाचे ४८९१ रुग्ण नव्याने आढळले आहेत, तर याच्या पुढचा टप्पा म्हणजे बहुतांश औषधांना दाद न देणाऱ्या (एक्सडीआर) क्षयरोगाचे ६७० रुग्ण नव्याने आढळले आहेत.

२४ मार्च या 'क्षयरोग दिना'च्या निमित्ताने पालिकेने मुंबईतील क्षयरोगाची स्थिती जाहीर केली असून मुंबईत क्षयरोगाचा विळखा वाढतच असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. २०१७ मध्ये मुंबईतील २४ प्रभागांमध्ये सुमारे १७ लाख व्यक्तींची तपासणी केल्यानंतर यातील ६६३० रुग्ण संशयित असल्याचे आढळले. यापैकी ३०४ रुग्णांना क्षयरोग असल्याचे चाचणीमधून निष्पन्न झाले.

मुंबईतील गेल्या वर्षभरात काही औषधांना दाद न देणाऱ्या क्षयरोगाचे ४८९१ रुग्ण नव्याने आढळले आहेत. बहुतांश औषधांना दाद न देणाऱ्या (एक्सडीआर) क्षयरोगाच्या रुग्णांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असून वर्षभरात ६७० रुग्ण नव्याने आढळले आहेत. येत्या मे महिन्यापासून पालिकेकडून क्षयरोग शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. सुमारे २०० औषधविक्रेत्यांमार्फत क्षयरोगाची औषधे मोफत पुरविली जाणार आहेत.

------------------------(पृष्ठ 1 वरुन)------------------------

## मिरा भाईंदर वाहतुक पोलिसांची धडक कारवाई

दुचाकी स्वार मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण करतात हे वेळोवेळी निदर्शनात येते याचे उदाहरण म्हणजे दुचाकीचा सायलेंसरवर बदल करून मोठ्यात-मोठा आवाज कसा येईल यासाठी नवतरुण आपल्या वाहनांच्यामध्ये बदल करतात. यामध्ये काही कंपन्यासुद्धा जबाबदार आहेत. उदा. इनफील्ड, होंडा या कंपन्यांच्या दुचाकीचा खूप मोठ्या प्रमाणात आवाज होत असतो. हे दुचाकीस्वार रात्री अपरात्री केव्हाही घरी परतताना आपल्या वाहनांचा आवाज करत ये-जा करतात. यावर वाहतुक पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी जनतेकडून होत आहे. पोलिसांनी पकडलेल्या वाहनांचा गैरवाहनांचा खचाखच ढिग पडलेला पाहण्यात येतो. यासाठी सरकारने फास्ट ट्रॅक वर खटले चालवून वाहनांचा निर्णय त्वरीत लावावा अशी मागणी सोशल राईट्स फाऊंडेशन या संघटनेच्यावतीने करण्यात येते.

## प्लॅस्टिकबंदीमुळे दूधदर वाढणार नाहीत, पिशवीसाठी फक्त ५० पैसे डिपॉझिट लागणार

**मुंबईः** महाराष्ट्र सरकारकडून राज्यात प्लास्टिक बंदीची अधिसूचना जारी करण्यात आल्यानंतर शनिवारी पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्लॅस्टिकबंदीबाबतच्या अनेक शंका दूर केल्या. प्लॅस्टिक बंदीमुळे पिशवीतून मिळणाऱ्या दुधाचे दर वाढतील, अशी चर्चा होती. मात्र, रामदास कदम यांनी दुधाच्या दरात कोणतीही वाढ होणार नसल्याचे स्पष्ट केले. केवळ पिशवीबंद दुधाची खरेदी करताना ५० पैसे डिपॉझिट म्हणून घेतले जातील. या पिशव्या दूध डेअरी, वितरक आणि विक्रेते यांना पुनर्खरेदी करणे बंधनकारक असेल. ग्राहकाने दुधाची रिकामी पिशवी केल्यावर ग्राहकाला ते पैसे परत मिळतील.

तसेच एक आणि अर्धा लीटरच्या प्लास्टिक बाटलीसाठीही एक आणि दोन रुपये अतिरिक्त मोजावे लागतील. दुकानदार आणि विक्रेते यांना या बाटलीची पुर्नखरेदी करणे बंधनकारक असेल. बॉटल परत केल्यावर ग्राहकांना एक आणि दोन रुपये परत मिळतील. मात्र, जर ग्राहकाने दुधाची पिशवी व प्लास्टिक बॉटल परत केली नाही, तर त्यांचे पैसे वाया जाणार आहेत. प्लास्टिक बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर जास्तीत जास्त २५ हजार आणि तीन महिन्याच्या कारावासाची शिक्षा होईल अशी कायद्यात तरतूद करण्यात आली असून दर तीन महिन्यानी या बंदीचा आढावा घेऊन त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात येणार आहे.

# आठ वर्षांत दोन हजार बनावट पॅनकार्ड

पनवेलच्या जुईगावातील बांगलादेशींसोबत उल्हासनगरमधून अटक केलेल्या व्यक्तीने गेल्या आठ वर्षांमध्ये सुमारे दोन हजारांहून अधिक बनावट पॅनकार्ड आणि असंख्य आधारकार्ड बनवून विकल्याची धक्कादायक माहिती राज्य दहशतवादविरोधी पथकाच्या (एटीएस) चौकशीतून समोर आली आहे. या व्यक्तीने सर्वच्या सर्व कार्ड भारतात घुसखोरी केलेल्या बांगलादेशींनाच विकल्याचा एटीएसचा संशय आहे. त्या दृष्टीने या व्यक्तीकडे एटीएस कसून चौकशी करत आहे. १३ मार्च रोजी एटीएसच्या नवीमुंबई पथकाने जुई गावात छापा घालून पाच बांगलादेशींना अटक केली. त्यांच्याकडे आधार आणि पॅनकार्ड आढळली. त्याबाबत चौकशी केल्यानंतर उल्हासनगर येथे वास्तव्यास असलेल्या आरोपीचे नाव पुढे आले. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार आरोपीचे बहुतांश ग्राहक बांगलादेशी घुसखोर होते, असा संशय आहे. त्या दृष्टीने तपास सुरू आहे. या आरोपीने पॅन किंवा आधार कार्ड बनवून दिलेले घुसखोर सध्या कुठे आहेत, काय करतात याबाबत माहिती घेण्याचे काम सुरू आहे.



एटीएसने या व्यक्तीच्या निवासस्थानी छापा टाकला १४ नव्याने तयार केलेली पॅन आणि आधार कार्ड हस्तगत करण्यात आली. तर असंख्य कोरे अर्ज, विविध व्यक्तींची कागदपत्रेही आढळली. चौकशीत गेल्या आठ वर्षांपासून हा आरोपी कागदपत्रे असलेल्या किंवा नसलेल्यांना पॅनकार्ड तयार करून देत होता. एक पॅनकार्ड तो ७०० ते ८०० रुपयांमध्ये तयार करून घेत असे. मात्र त्यासाठी दुप्पट किंवा तिप्पट पैसे ग्राहकाकडून घेत असे. अशा पद्धतीने त्याने गेल्या आठ वर्षांमध्ये दोन हजारांहून अधिक पॅनकार्ड तयार करून विकल्याची माहिती पुढे आली. या अवैध कामासाठी कोणाकोणाची मदत घेतली अधिक चौकशी सुरू आहे.

# संपादकीय... उशिराने आलेले शहाणपण


संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

कुपोषणाच्या प्रश्नावरचे एक आश्वासक उत्तर असणाऱ्या अंगणवाडी सेविका व कर्मचाऱ्यांना 'महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा कायदा' (मेस्मा) लावून त्यांचा संपाचा अधिकार काढून घेणे, ही राज्य सरकारने केलेली मोठी गफलत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या मागणीसमोर मान तुकवून हा निर्णय मागे घेतला, हे सरकारला उशिरा आलेले शहाणपण म्हणावे लागेल. मात्र, त्यासाठी विधिमंडळाचे कामकाज सात-आठवेळा तहकूब करावे लागले. महिला आणि बालकल्याण खात्याने राज्यातील दोन लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांना हा कायदा लागू करण्याचा निर्णय कसा काय घेतला आणि तो घेण्यापूर्वी वरिष्ठ पातळीवर काही विचारविनिमय झाला होता की नाही, हे कळायला हवे. 'उद्या अंगणवाडी सेविका पुन्हा संपावर गेल्या आणि राज्यात त्यामुळे बालमृत्यूंचे प्रमाण वाढले तर विरोधक त्याची जबाबदारी घेणार का' असा प्रश्न मंत्र्यांनी सभागृहात केला खरा; पण या सेविकांवर संपावर जाण्याची वेळच येऊ न देणे, ही जबाबदारी सरकारची आहे. गेल्या वर्षी या सेविका संपावर गेल्या तेव्हा त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय झाला. या वाढीचा पुढचा टप्पा एक एप्रिलपासून अपेक्षित आहे. त्यावेळी, संपावर तोडगा काढताना एक एप्रिल २०१८ पासून अंगणवाडी सेविकांना पाच टक्के वेतनवाढ देण्यात येईल, असे जाहीर झाले होते. या



मुहूर्ताला आता फार दिवस उरलेले नाहीत. विधिमंडळाचे अर्थसंकल्पी अधिवेशन चालू आहे. मग सरकारने हा निर्णय जाहीर का करू नये? तसेच, गेल्या वर्षी मुख्यमंत्र्यांनी सरसकट दीड हजार रुपये मानधनवाढ जाहीर केली, तिचे काय झाले? आज दोन लाख सेविकांना ही वाढ दरमहा मिळते का? या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक नाहीत. पाच टक्के वेतनवाढीवर अर्थखात्यातील काही अधिकाऱ्यांनी शंका उपस्थित केल्याचे सांगण्यात येते. तशा त्या असल्या तरी त्यांचे निरसन वेगाने करून नव्या आर्थिक वर्षात मुख्यमंत्र्यांनी आधी जाहीर केलेली वाढ तसेच एक एप्रिलपासून अपेक्षित असणारी वाढ हे दोन्ही अमलात यायला हवे. हा केवळ सेविकांच्या मानधनाचा मुद्दा नाही. सध्या सरकार शून्य ते सहा या वयोगटातील अंगणवाडीत येणाऱ्या दरेक मुलामागे दिवसाकाठी केवळ चार रुपये ९३ पैसे देते. पोषक आहाराची ही दरडोई रक्कम हा खरोखर विनोद आहे. ही रक्कम निदान दरडोई सहा रुपये करावी, ही मागणी होती. ती मान्य झाली आहे. पण ती अमलात आली का आणि तसे पैसे सर्व अंगणवाड्यांना मिळू लागले का, हाही प्रश्न अजून अनुत्तरित आहे. या पैशातूनच मुलांना पुरेशा प्रमाणात पोषक आहार मिळणे, अपेक्षित असते. १९७५ मध्ये देशभरात अंगणवाडी योजना सुरू झाली तेव्हापासून आजपर्यंत अंगणवाड्यांनी बालमृत्यू तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यात मोठे यश मिळाले आहे. गर्भवती तसेच स्तनदा मातांचे आरोग्य आणि त्यांचे पोषण यातही अंगणवाड्यांनी लक्षणीय कामगिरी बजावली आहे. अनेक अभ्यासांमधून ते सिद्ध झाले आहे. असे असताना या सेविकांना पुन्हा पुन्हा दाद मागण्यासाठी सरकारच्या दारात यावे लागणे, हे लांच्छनास्पद आहे. तरीही या सेविकांना तुम्ही 'मेस्मा' लावत असाल तर त्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व भत्ते द्या, हा विरोधकांचा युक्तिवाद चूक नाही. या विरोधकांनी स्वतः सत्तेवर असताना काय केले, हा प्रश्न अगदी अलाहिदा आहे. तो उपस्थित करून सरकारला आत्ता त्यामागे लपता येणार नाही. अंगणवाड्यांची संख्या कमी करण्याचा एक प्रस्ताव आहे. तसेच, काही ठिकाणी खोटी हजेरी लावण्याचे तसेच इतर गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी आहेत. पण यावर उत्तर सरकारनेच शोधायचे आहे. ते न शोधता हजारो प्रामाणिक सेविका आणि त्यांच्यावर अवलंबून असणारी लक्षावधी मुले यांच्यावर अन्याय करण्याचे काही कारण नाही. मंत्रिमंडळात महिला आणि बालकल्याण किंवा शिक्षण ही खाती दुय्यम मानण्याची मानसिकता जाईल आणि पुढची पिढी घडवण्याची ही सर्वात महत्त्वाची जबाबदारी ज्या दिवशी मंत्री तसेच नोकरशाहीला आतून समजेल, त्या दिवशी 'मेस्मा'सारखे कायदे लावण्याची अशी घोडचूक होणार नाही. त्याऐवजी, या अंगणवाडी सेविकांचे मन जिंकून घेण्याचे प्रामाणिक प्रयत्न होतील.

# समाज (कंटक) माध्यमे

एक छान म्हण आहे इंग्रजीत- 'मोफत भोजन असे काहीही नसते'. त्याची किंमत चुकवावीच लागते. पण हा मोफतचा मोह भल्याभल्यांचा धृतराष्ट्र करून टाकतो. तेथे सामान्यांची काय कथा? त्यांना 'फुकट', 'एकावर एक मोफत' अशा विक्रीकलेच्या तंत्रांनी ग्राहकाच्या भूमिकेपासून कधीच दूर नेले आहे. आजच्या माहितीयुगाचा हा प्रस्थापित कायदाच आहे, की आपणांस कोणतीही गोष्ट मोफत दिली जात असेल, तर तेथे आपली भूमिका ग्राहकाची राहातच नाही. तेथे आपणच एक विक्रीयोग्य उत्पादन बनत असतो. फेसबुक माहितीसंच चोरीच्या नुकत्याच जगजाहीर झालेल्या प्रकरणातून आभासी विश्वातील हे वास्तव अत्यंत नग्नपणे समोर आले. 'केंब्रिज ॲनालिटिका'मधील एक माजी अधिकारी ख्रिस्तोफर वायली याने माहितीचोरीचे हे बिंग फोडले. वस्तुत त्याने केलेल्या गौप्यस्फोटात काहीही नवे नाही. हे असे काही पहिल्यांदाच घडले आहे असे नाही. केवळ फेसबुकनेच हे केले असेही नव्हे. माहितीयुगात डेटा वा माहितीसंच हेच चलनी नाणे आहे, त्याची किंमत इंधनतेलाहून अधिक आहे. तेव्हा ते विकले जाणारच होते. येथे प्रश्न असा येतो की हे सर्व जर सर्वांनाच माहीत होते, तर या तथाकथित गौप्यस्फोटाने सर्व जगालाच मानसिक धक्का बसल्यासारखे का झाले?

याचे उत्तर दडले आहे ते त्या माहितीचा वापर ज्या प्रकारे झाला त्यात. केवळ वापरच नव्हे, तर त्यातून लोकांच्या मनावर नियंत्रण ठेवण्यासंबंधीच्या विविध शक्यताही जगजाहीर झाल्या, त्यामुळे या धक्क्याची तीव्रता अधिकच वाढली. हा वापर, या शक्यता ते सारेच एवढे भयंकर आहे, की आज प्रलयघंटावाद म्हणून त्याची वासलात लावणे सहज शक्य आहे. व्यक्तीचे खासगीपण, तिचे स्वातंत्र्य याबाबतच्या सजगपणाचा अभावच नव्हे, तर या गोष्टींबाबतच्या तिरस्काराची सांस्कृतिक परंपरा असलेल्या तिसऱ्या जगामध्ये – तुम्ही म्हणजे अतिच सांगता, असे काही होत नसते, कारण लोकांना सगळे काही माहीत असते – असे म्हणून हा विषय तुच्छतेने सहजच उडविला जाऊ शकतो. पण त्याला वाळूत तोंड खुपसणे असे म्हणतात. ज्यांच्यासाठी वैयक्तिक स्वातंत्र्य आणि खासगीपणा हे जपण्यायोग्य मूल्य आहे, त्यांना असा शहामृगी बाणा पत्करता येणार नाही. त्यांना हे प्रकरण मुळातून समजून घ्यावे लागेल. या प्रकरणाचे मूळ कोणत्याही तंत्रज्ञानात नसून, ते दडलेले आहे 'सहमती निर्मिती आणि अभियांत्रिकी' या संकल्पनांमध्ये. सामान्य जनता ही मेंढराप्रमाणे असते. आपणांस हवी तशी सामाजिक, राजकीय वा आर्थिक संरचना उभारायची असेल, तर या मेषझुंडीच्या वर्तनावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. हे दंडशक्तीने करता येते. त्याला हुकूमशाही म्हणतात. परंतु त्यात धोके खूप असतात. त्यापेक्षा व्यक्तीचे मन वळवणे, आपणांस हवी तशी तिची सहमती तयार करणे हे सोपे आणि चिरंतन टिकाऊ. प्रोपगंडाच्या विविध तंत्रांनी ते करता येते. तसे केले गेले आहे. आजही केले जात



आहे. त्यासाठी आजवर पत्रकांपासून वृत्तपत्रांपर्यंत, भित्तिचित्रांपासून चित्रपटांपर्यंत विविध प्रकारची साधने प्रभावीपणे वापरली गेली. एकविसाव्या शतकात या साधनांना जोड मिळाली ती माहिती-तंत्रज्ञानातील क्रांतीची. दरम्यानच्या काळात मानवी मनाच्या अभ्यासात मोठीच प्रगती झाली होती. तिने आणि माहिती-तंत्रज्ञानक्रांतीने प्रोपगंडा तंत्र आणि साधनांची दिशाच बदलली. आजवर प्रोपगंडा राजकीय असो वा उत्पादनविक्रीसाठीचा, तो प्रामुख्याने समूहलक्ष्यी होता. तो चित्रपट, वृत्तपत्रे, नभोवाणी वा दूरचित्रवाणी यांसारख्या जनमाध्यमांतून – मासमीडियातून – व्यक्तीपर्यंत नेला जात असे. समूहातील सर्व व्यक्तींपर्यंत जाणारा संदेश हा एकसमान असे. त्यामुळे त्याचा सर्वांवरच सारखा परिणाम होणे कठीण होते. त्याऐवजी समजा प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, गरजा, त्याचा स्वभाव, त्याचे विचार येथपासून आर्थिक क्षमता हे सर्व ध्यानात घेऊन त्याच्यावर खोल परिणाम करील असे संदेश त्याला पाठवता आले तर?

परंतु हे करायचे तर त्या व्यक्तीची सर्व माहिती आपल्याकडे हवी. येथे उपयोगास आले माहिती-तंत्रज्ञान, इंटरनेट, मोबाइल, त्यातील विविध उपयोजनस्थले, त्यातील समाजमाध्यमे. लोक काय पाहतात, कसे वागतात, काय विचार करतात हे समजून घेण्यासाठी पूर्वीचे हुकूमशहा गुप्तचर नेमत असत. लोकांच्या घरांत गुपचूप पाळतयंत्रे ठेवत असत. आता हे करण्याची आवश्यकताच उरली नाही. लोकच आता स्वमर्जीने ही माहिती पुरवत आहेत. आपण दिवसभरात ऑनलाइन वा ऑफलाइन जे काही करतो त्याचा माहितीसंच म्हणजे बिगडेटा. विविध साधनांतून आणि समाजमाध्यमांतून तो मिळवला जात असतो. फेसबुक हे त्यातलेच एक. तेथे आपण जे काही उद्योग करतो, लिहितो, पाहतो, आवडी नोंदवितो त्याची नोंद होते हा या प्रकरणातील एक भाग. त्याचा दुसरा भाग सुरू होतो तो या नोंदींचा वापर नेमका कसा करायचा येथून. येथे प्रवेश होतो ब्रिटनमधील 'स्ट्रॅटेजिक कम्युनिकेशन लॅबोरेटरीज' आणि तिची उपकंपनी असलेल्या 'केंब्रिज ॲनालिटिका'चा. केंब्रिज विद्यापीठातील सायकोमेट्रिक सेंटरमधील संशोधनातून बिगडेटाच्या साहय़ाने व्यक्तीचे मानसशास्त्रीय चित्र तयार करणे शक्य झाले होते. 'ओशन मॉडेल' म्हणून ते ओळखले जाते. ते एवढे सक्षम आहे की त्याद्वारे केवळ फेसबुकवरील लाइक्सच्या आधारे त्या व्यक्तीचा स्वभावच नव्हे, तर त्याच्या त्वचेचा रंग, लैंगिक आवड, आवडता पक्ष अशा अनेक गोष्टी अचूक सांगता येतात. एकदा हे सर्व ओळखणे सोपे झाल्यानंतर कोणत्या व्यक्तीवर कोणत्या प्रकारच्या जाहिरातींचा मारा करायचा, त्यात प्रोपगंडाची कोणती तंत्रे वापरायची हेच ठरवायचे होते. केंब्रिज ॲनालिटिकावर असा आरोप आहे की त्यांनी आधी हे तंत्र भलत्याच मार्गाने हस्तगत केले. फेसबुकवरून लक्षावधी व्यक्तींची माहितीनोंद मिळवली . समाजमाध्यमांमुळे प्रत्येक व्यक्तीला एकेकटे गाठणे सोपेच बनले होते. केंब्रिज ॲनालिटिकाने अशा प्रकारे व्यक्तीलक्ष्यी प्रोपगंडा करण्यास सुरुवात केली. त्यांचे पहिले मोठे यश पाहायला मिळाले ब्रेग्झिटमध्ये आणि नंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयामध्ये. आज अनेक देशांमध्ये ही कंपनी वा तिच्या उपकंपन्या प्रोपगंडाचा उद्योग करीत आहेत. भारतातही त्यांनी वेळोवेळी या अथवा त्या पक्षासाठी काम केलेले आहे.

व्यक्तीला वेचून काढून त्याच्या नकळत त्याच्यावर प्रोपगंडाच्या तंत्रांचा मारा करणे हे एकंदर समाजासाठी किती घातक ठरू शकते याची कल्पनाच करायची असेल, तर त्यासाठी आपल्याला जॉर्ज ऑर्वेल यांच्या 'नाइन्टीन एटी फोर' या कादंबरीकडे जावे लागेल. आपण वैचारिक गुलाम आहोत आणि त्याचा आपल्याला पत्ताही नाही आणि त्यामुळे आपले सत्ताधारी – मग ते आर्थिक क्षेत्रातील असोत वा राजकीय – सहजच आपल्या सहमतीची निर्मिती करू शकतात, ही स्थितीच भयानक आहे. परंतु त्याकडे हळूहळू सर्वांचाच प्रवास सुरू आहे. आपल्याहाती कवडीमोलाने 'इंटरनेट डेटा' दिला जात आहे. लोकांनी अधिकाधिक ऑनलाइन राहावे आणि विविध संकेतस्थळांतून, फेसबुक, व्हाट्स ॲप, ट्विटर यांसारख्या मोफत समाजमाध्यमांतून आपली माहिती पेरत राहावे असा हा सर्व उपक्रम आहे. आम्ही तुमच्यासमोर मोफतच माहितीनग्न होतो, तुम्ही त्याचा वापर करून आम्हांला भावेल अशा जाहिराती दाखवा, तसे प्रचारी संदेश पाठवा, आम्ही त्यानुसार वागू अशा परिस्थितीकडे आपण चाललो आहोत.

# कचऱ्याचे शुल्क पुन्हा मानगुटीवर!

## महापालिकेकडून ठाण्यातील व्यापाऱ्यांना नोटिसा; निवडणुकीत फटका बसण्याची राजकीय पक्षांना भीती



ठाणे - लोकसभा निवडणुकांचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली असतानाच ठाणे शहरात घनकचऱ्याचा प्रश्न पुन्हा उग्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठाणे शहरातील दुकाने, हॉटेले तसेच आस्थापनांमधील कचरा उचलण्याच्या मोबदल्यात पालिकेकडून घनकचरा सेवाशुल्क आकारण्यात येत असून याकरिता नोटिसा बजावण्यास सुरुवात झाली आहे. कचरा कर भरण्यास असहकार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर कचरा टाकण्याची कारवाई वर्षभरापूर्वी महापालिका प्रशासनाने केली होती. हा मुद्दा भलताच पेटल्याने घनकचरा कराची आकारणी करू नये, असा ठराव सत्ताधारी शिवसेनेने सर्वपक्षीयांच्या मदतीने केला होता. मात्र, आयुक्त संजीव जयस्वाल यांनी या ठरावाला केराची टोपली दाखवली असून या कराच्या वसुलीसाठी व्यावसायिकांना नोटिसा बजाविण्यास सुरुवात केल्याने सत्ताधारी शिवसेनेसह व्यापारी मतांवर विसंबून असलेल्या भाजपमध्येही अस्वस्थता वाढीस लागली आहे. ठाणे महापालिकेत महापौर मीनाक्षी शिंदे आणि आयुक्त संजीव जयस्वाल यांचे शीतयुद्ध सुरू असून विविध मुद्द्यांवर प्रशासनाची खरडपट्टी काढणाऱ्या महापौरांना एकाकी पाडण्याचे जोरदार प्रयत्न सध्या सुरू झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत असलेल्या सख्यामुळे जयस्वाल आम्हाला जुमानत नाहीत, अशी भावना शिवसेना-भाजपमधील नगरसेवकांच्या एका मोठ्या गटात आहे. ही नाराजी एकीकडे वाढत असताना कचरा कराच्या मुद्द्यावरही जयस्वाल यांनी शिवसेनेला वाकुल्या दाखविल्याने सत्ताधारी नगरसेवक गोंधळून गेले आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रातील व्यावसायिकांकडून घनकचरा सेवा शुल्क आकारणीचा प्रस्ताव दोन वर्षांपूर्वी प्रशासनाने सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवला होता. या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्यानंतर प्रशासनाने त्याची अंमलबजावणी सुरू केली होती. त्याचाच एक भाग म्हणून गेल्यावर्षी शहरातील व्यावसायिकांना या कराच्या नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या. मात्र, हे अतिरिक्त शुल्क भरण्यास व्यावसायिकांनी विरोध दर्शविला होता. अखेर या कराच्या वसुलीसाठी घनकचरा विभागाने व्यावसायिकांच्या दुकानांवर कचराफेक सुरू केली होती. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या व्यावसायिकांनी दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला होता. तसेच महापालिकेसमोर ठिय्या आंदोलनही केले होते. दरम्यान, सत्ताधारी शिवसेना आणि भाजपने या प्रकरणात उडी घेत घनकचरा शुल्क आकारणी वसूल करण्यात येऊ नये, असा ठराव सर्वसाधारण सभेत केला होता. असे असतानाही प्रशासनाने या कराच्या वसुलीसाठी पुन्हा नोटिसा धाडण्यास सुरुवात केल्याने व्यावसायिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने शहरातील व्यावसायिकांना घनकचरा सेवा शुल्काच्या वसुलीसाठी नोटीस पाठविली आहे. त्यामध्ये एक वर्षांचे शुल्क आकारण्यात आले आहे. नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत हे शुल्क भरण्यास सांगण्यात आले आहे. हे शुल्क भरले नाहीतर पाणी जोडण्या तोडण्यात येतील, असेही नोटीसमध्ये म्हटले आहे.

# तलावपाळी परिसरात झाडांना रोषणाईचा 'फास'

**ठाणे** - चैत्र नवरात्रोत्सवानिमित्त जांभळी नाका येथील तलावपाळी परिसर रोषणाईने उजळून जात असला तरी, यामुळे परिसरातील झाडांचा श्वास कोंडू लागला आहे. हा परिसर झगमगवण्यासाठी सर्व झाडांवर प्रकाशाच्या विद्युतमाळा सोडण्यात आल्या असून त्यामुळे झाडांचे आयुर्मान कमी होण्याची भीती पर्यावरणप्रेमी व्यक्त करत आहेत. पालिकेतील सत्ताधारी शिवसेनेच्या एका बड्या नेत्याच्या पुढाकाराने होणाऱ्या या उत्सवात



'हरित ठाणे' संकल्पनेला असा फाटा देण्यात येत असताना पालिका प्रशासनानेही त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शिवाजी मैदान येथे चैत्र नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत आहे. रविवार पासून या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली असून संध्याकाळी मोठय़ा प्रमाणात नागरिक या उत्सवाला भेट देत असतात. उत्सवाच्या निमित्ताने आजूबाजूचा परिसर रोषणाईने उजळून गेला आहे. जागोजागी या परिसरात विद्युत प्रकाशमाळांचा वापर करून रोषणाई करण्यात आली आहे. मात्र हे करताना परिसरातील झाडांनाच 'फास' लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. झाडांच्या खोडांना विद्युत माळांनी वेटोळे घालण्यात आले आहेत. तसेच झाडांच्या फांद्यांवर या विद्युत प्रकाश माळा टाकण्यात आल्या आहेत. तलावाभोवती असणाऱ्या काही झाडांच्या फांद्या या तलावातील आतील दिशने झुकल्या आहेत. त्यामुळे सोसाट्याचा वारा आल्यावर या माळा हलू लागतात. त्या तलावात पडल्यास विद्युतप्रवाह पाण्यात उतरण्याची भीती काही सुज्ञ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# मेट्रोसाठी पुलांना कात्री

## कासारवडवली ते गायमुखदरम्यानचे सर्व उड्डाणपुलांचे नियोजन रद्द; एमएमआरडीएच्या निर्णयामुळे वाहनांच्या रहदारीला फटका बसण्याची भीती

**ठाणे** - मुंबई-ठाणेदरम्यान प्रवासी वाहतुकीचा जलद पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी वडाळा ते कासारवडवली अशी मेट्रो सुरू करण्यात येत असली तरी, याचा फटका घोडबंदर मार्गावरील वाहनांच्या रहदारीला बसण्याची शक्यता आहे. घोडबंदर मार्गावर दररोज होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी रस्ते विकास महामंडळ आणि मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) आखलेले सर्व उड्डाणपूल रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मेट्रोचा विस्तार मुख्य रस्त्यावरून करण्यात येत असल्याने पुलांचे नियोजन रद्द करण्यात येत असल्याचे एमएमआरडीएचे म्हणणे आहे. मात्र यामुळे घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडी भविष्यात आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

मुंबई ते ठाणे दरम्यान वाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी राज्य सरकारने यापूर्वीच वडाळा-घाटकोपर- ठाणे- कासारवडवली या मेट्रो मार्गाची आखणी केली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाचा भूमीपूजन समारंभही उरकण्यात आला. या मेट्रोचा विस्तार करण्यात यावा, अशी मागणी वेगवेगळ्या माध्यमांतून करण्यात येत होती. त्यानुसार कासारवडवली ते गायमुखपर्यंत मेट्रोचा विस्तार करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हिरवा कंदील



दाखवला आहे. नुकत्याच झालेल्या एमएमआरडीएच्या बैठकीस ४ किलोमीटर अंतराच्या या प्रकल्पास आणि त्यासाठी लागणाऱ्या ९४५ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र आता ही मेट्रो घोडबंदर मार्गावरील वाहनांसाठी अडचणीची ठरणार आहे.

वडाळा ते ठाण्यापर्यंतचा हा मेट्रो मार्ग रस्त्याच्या मधोमध असताना ठाण्यात येऊन तो बऱ्याच ठिकाणी सेवा रस्त्यांना खेटून उभारण्यात येणार असल्याचा मुद्दा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून उपस्थित करण्यात आला होता. सेवा रस्त्यांना लागून होत असलेल्या उभारणीमुळे मेट्रोची स्थानके एका कोपऱ्यात जातात तसेच मार्गिकेचा खर्चही वाढण्याची शक्यता असते असे काही तज्ज्ञांचे मत आहे. पूर्वद्रुतगती महामार्गावर ठाणे शहरात जागोजागी उड्डाणपुलांची उभारणी करण्यात आली असून यामुळे रस्त्यांच्या मधोमध मेट्रो मार्ग उभारणे शक्य नसल्याचा मुद्दा यापूर्वीच एमएमआरडीएने स्पष्ट केला आहे. घोडबंदर मार्गावर कापुरबावडी, मानपाडा येथे उड्डाणपूल असून या मार्गावरील वाहतुकीचा भार लक्षात घेऊन कासारवडवली, गायमुख भागांतही उड्डाणपुलांची आखणी करण्यात आली होती. मात्र मेट्रोचा विस्तार होताच पुढील मार्गावरील सर्व उड्डाणपूल रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती एमएमआरडीएमधील वरिष्ठ सूत्रांनी दिली. घोडबंदर मार्गावर जेथे जेथे उड्डाणपूल आहेत तेथे मेट्रोची मार्गिका सेवा रस्त्यांवर घेण्याशिवाय पर्याय नाही. मात्र कासारवडवली ते गायमुख हा मार्ग वर्दळीचा असूनही त्या ठिकाणी एकही उड्डाणपूल अद्याप उभारला गेलेला नाही. त्यामुळे या ठिकाणी मध्यभागातून मेट्रोचा मार्ग काढला जाईल आणि त्यासाठी नियोजित उड्डाणपूल रद्द करण्यात आले आहेत, असे स्पष्ट करण्यात आले.

# महापालिकेच्या योजना केवळ कागदावरच

**वसई** - वसई-विरार महापालिकेने १ हजार ८६७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प शुक्रवारी झालेल्या विशेष महासभेत उपसूचना आणि दुरुस्तीसह मंजूर केला. महापालिकेने यापूर्वी जाहीर केलेल्या अनेक योजना कागदावरच राहिल्या असल्याचे या अर्थसंकल्पातून उघड झाले आहे. पालिकेने उत्पन्नाचे मार्ग घटवले असून नवीन उत्पन्नाच्या स्रोताबद्दलही उदासीन असल्याचे दिसून आले. विरोधी आणि सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी या अर्थसंकल्पाची चिरफाड करत प्रशासनाला कोंडीत पकडले.

स्थायी समितीने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर शुक्रवारी महापालिकेच्या विशेष महासभेत चर्चा करण्यात आली. विरोधी पक्षाच्या सदस्यांसह एकूण १३ सदस्यांनी या अर्थसंकल्पावर आपले मत मांडून सूचना केल्या. महापालिकेने अर्थसंकल्प सादर करताना यापूर्वी अनेक घोषणा केल्या होत्या. त्या योजना कशा कागदावर राहिल्या ते सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. उत्पन्नाच्या अनेक स्रोतांवर पालिकेने पाणी सोडले असून त्याचा मोठा आर्थिक फटका पालिकेला सोसावा लागत आहे. शिवसेनेच्या गटनेत्या किरण चेंदवणकर यांनी अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली. मागील अर्थसंकल्प सुधारित होताना १३१



कोटी २५ लाख रुपयांनी कमी झाला, तसेच मागील अर्थसंकल्पात १०५ कोटी ३० लाख रुपयांची शिल्लक होती, ती वाढून २०१ कोटी ६४ लाखांची झाली. एवढी मोठी शिल्लक का राहिली, खर्चात घट का झाली, असा सवाल करत त्यांनी अर्थसंकल्पात आकडे फुगवले गेले असल्याची शक्यता वर्तवली.

शिवसेनेच्या किरण चेंदवणकर आणि बविआच्या सुदेश चौधरी यांनी पालिकेने आपल्या अनेक योजना कागदावरच असल्याचे निदर्शनास आणून दिले. मागील अर्थसंकल्पात बहुमजली वाहनतळ, रो-रो फेरीसेवा, वस्तुसंग्रहालय, वसई दर्शन, पर्यटन, स्कायवॉकजवळ सरकते जिने, शवविच्छेदनगृह, रिंग रूट आदी योजना एका वर्षांत करण्यात असल्याचे सांगण्यात आले होते, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. देवगिरी उपवन टेकडीचा विकास, फर्नीक्युलक ट्रेन आदी योजनांचे पुढे काय झाले, असा सवाल सुदेश चौधरी यांनी केला.

# भाईंदरमधील 'बंदरवाडी परिसरातील' झोपड्यांवरील कारवाईला उच्च न्यायालयाची स्थगिती

**भाईंदर - पुर्वेकडील बंदरवाडी परिसरातील जुना सव्हे क्र. २०९ (नवीन सव्हे क्र. १५) या सरकारी सीआरझेड बाधित दफनभूमी प्रस्तावित असल्याने ती त्वरीत रिकामी करण्यासाठी १९८० पुर्वीच्या १३५ झोपडीधारकांच्या मागे जिल्हाप्रशासनासह पालिकेने तगादा लावला आहे. याविरोधात झोपडीधारकांनी २०१७ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर २१ मार्चला पार पडलेल्या सुनावणीत न्यायालयाने 'त्या' झोपड्यांवरील कारवाईला स्थगिती आदेश दिला आहे. यामुळे त्या झोपड्या तुर्तास कारवाईपासून बचावल्या आहेत.**

तत्पूर्वी या झोपड्या बंदरवाडी परिसरातीलच पश्चिम रेल्वेच्या जागेत १९८० पुर्वीच बांधण्यात आल्या होत्या. त्या १० मार्च २००३ रोजी रेल्वे प्रशासनाने पालिकेच्या सहकार्याने हटवून रेल्वेने जागा ताब्यात घेतली. सध्या या जागेवर रेल्वेच्या इमारती बांधण्यात येत आहेत. दरम्यान त्या झोपडीधारकांना पर्यायी जागा द्यावी, अशी मागणी भाजपाचे ज्येष्ठ नगरसेवक रोहिदास पाटील यांनी जिल्हाप्रशासनाकडे केली होती. त्यावर जिल्हाप्रशासनाने पालिकेच्याच संमतीने त्या झोपडीधारकांना बंदरवाडी परिसरातीलच जुना सव्हे क्रमांक २०९ या सरकारी जागेत पर्यायी जागा दिली. सध्या या जागेत ते झोपडीधारक वास्तव्य करीत असले तरी त्यांना पालिकेने, जागा सीआरझेड बाधित असल्याने पाणी व वीजपुरवठ्याच्या मुलभूत सोईसुविधांपासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे तेथील झोपडीधारकांना आसपासच्या परिसरातून पाणी आणावे लागत असुन संसाराची दिनचर्या पार पाडावी लागत असुन विद्यार्थ्यांना सुद्धा अंधारातच अभ्यास करावा लागत आहे. एरव्ही एखाद्या बिल्डरच्या अथवा लोकप्रतिनिधीच्या बांधकामाला (ते अनधिकृत असतानाही) त्वरीत पाणी व वीजपुरवठा देण्याची तजवीज केली जाते.

मात्र, गरीबांसाठी कायद्यावर बोट ठेवून पालिका त्यांना मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवत असल्याचा आरोप केला जात आहे. सध्या या जागेवर पालिकेने मुश्लिम समाजासाठी दफनभूमी प्रस्तावित केली असुन त्याचा ठराव तत्कालिन महासभेत मंजुरही केला आला आहे. त्याला सेनेचा विरोध असला तरी दफनभूमीच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हि सरकारी जागा पालिकेकडे नुकतीच हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे ती जागा रिकामी करण्यासाठी पालिकेकडुन जोरदार प्रयत्न सुरु असुन त्याला भाजपा सत्ताधारी देखील पाठबळ देत असल्याचा आरोप स्थानिकांकडुन केला जात आहे. तत्पुर्वी या जागेवरील झोपड्या हटविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पालिकेच्या सहकार्याने २०१७ मध्ये कारवाईचा प्रयत्न केला होता.



## मनसेच्या पत्रकार परिषदेत 'गुप्तहेर ट्रॅप'?




**मुंबई :** मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी मनसेच्या पत्रकार परिषदेत पोलिसांचा गुप्तहेर ट्रॅप झाल्याचा दावा केला आहे. मनसेची मुंबईत पत्रकार परिषद झाली, त्यात साध्या वेशात पोलीस कर्मचारी तेथे उपस्थित असल्याचं संदीप देशपांडे यांनी म्हटलं आहे. तसेच सरकार मनसेची हेरगिरी करत असल्याचा आरोपी देखील संदीप देशपांडे यांनी केला आहे. मनसेच्या पत्रकार परिषदेत हा पोलीस साध्या वेशात आढळल्यानंतर, त्याला विचारपूस करण्यात आली.

**हे लोकशाही विरोधात - मनसेचा आरोप**

तेव्हा त्यांनी ओळख लपवली असा आरोपी संदीप देशपांडे यांनी केला आहे. तसेच या पोलिसाचे नाव जाधव असून ते रेल्वे पोलिसांचे गुप्तहेर असल्याचं संदीप देशपांडे यांनी म्हटलं आहे. मनसेच्या पत्रकार परिषदेत तसेच राज ठाकरे यांच्या घराचे देखील पोलीस साध्या वेशात येऊन मोबाईलमध्ये शूट करतात असल्याचं संदीप देशपांडे यांनी म्हटलं आहे. हे लोकशाही विरोधात असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

## योगींनी घेतला पोटनिवडणुकीचा बदला, मायावतींना धक्का

***नवी दिल्ली - लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा वचपा काढत भाजपने उत्तर प्रदेशातील राज्यसभेच्या १० पैकी ९ जागा जिंकल्या. बसपाचे उमेदवार भीमराव आंबेडकर यांना पक्षाची दोन मते फुटल्याने पराभवाचा सामना करावा लागला आहे. सपाच्या उमेदवार जया बच्चन यांचा अपेक्षेप्रमाणे विजय झाला आहे. कर्नाटकातही भाजपने एक जागा जिंकली आहे.***



राज्यसभेत रिक्त होणाऱ्या एकूण ५८ जागांपैकी ३३ जागांवर बिनविरोध निवड झाली होती. उर्वरित सात राज्यांतील २५ जागांसाठी शुक्रवारी मतदान झाले आणि रात्री उशिरा मतमोजणीचा निकाल जाहीर झाला. २६ पैकी १२ जागा भाजपने जिंकल्या. त्यापैकी सर्वात उत्सुकतेच्या आणि प्रतिष्ठेच्या झालेल्या उत्तर प्रदेशमधील निवडणुकीत एक अतिरिक्त जागा भाजपाने जिंकून घेतली. उ. प्रदेशात भाजपला आठ जागा मिळणार, हे स्पष्ट होते. खरी चुरस नवव्या जागेसाठी भाजपने पाठिंबा दिलेले अनिल अग्रवाल आणि बसपाचे भीमराव आंबडेकर यांच्यात रंगली. भाजपने ही जागा जिंकू नये यासाठी मायावती आणि अखिलेश यादव एकत्र आले होते.

अनिल अग्रवाल यांना पहिल्या पसंतीची १६ मते मिळाली होती. दुसऱ्या फेरीत त्यांनी आंबेडकरांचा पराभव केला. बीआर आंबेडकरांना ३२ मते मिळाली. समाजवादी पार्टीकडून जया बच्चन ३८ मते मिळवून निवडून आल्या. भाजपाच्या अन्य आठ उमेदवारांना ३८ मते मिळाली. नुकत्याच झालेल्या फुलपूर आणि गोरखपूर येथील लोकसभा पोटनिवडणुकीत अखिलेश-मायावती यांनी एकत्र येऊन भाजपाचा पराभव केला होता. उत्तर प्रदेशातून केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यासह जी. व्ही. एल. नरसिंह राव, अनिल जैन, कांता कर्दम, विजयपाल तोमर, डॉ. अशोक वाजपेयी, हरनाथसिंह यादव, अनिल अग्रवाल आणि सकलदीप राजभर असे भाजपचे ९ उमेदवार विजयी झाले आहेत.

तत्पूर्वी, उत्तर प्रदेशात दहावी जागा कुणाच्या पदरात पडणार यावरून बराच सस्पेन्स निर्माण झाला होता. सपाचे आमदार नितीन अग्रवाल आणि बसपाचे आमदार अनिल सिंह यांनी पोलिंग एजंटला मतपत्रिका दाखवली नाही, असा आरोप करत या दोघांचे मते बाद करण्याची मागणी सपा-बसपाने केली होती. त्यानंतर मतमोजणी स्थगितही करण्यात आली होती.

जेडीएसचा बहिष्कार आणि त्यांच्या आमदारांनी केलेल्या बंडखोरीदरम्यान कर्नाटकातील राज्यसभा निवडणुकीत सत्ताधारी काँग्रेसला एका अतिरिक्त जागेचा बोनस मिळाला. त्यांनी एकूण तीन तर भाजपने एक जागा जिंकली.

काँग्रेसचे डॉ. एल. हनुमनथय्या, डॉ. सय्यद नसीर हुसेन आणि जी. सी. चंद्रशेखर तर भाजपच्या राजीव चंद्रशेखर यांनी विजय मिळवले. जेडीएसने निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्यानंतर मतमोजणीस उशिरा प्रारंभ झाला. काँग्रेसला दोन जागा मिळणार हे नक्की होते. तिसरी जागा त्यांनी जेडीएसचे बंडखोर आणि अपक्ष आमदारांच्या मदतीने जिंकली.

## चहा विकून आमदाराने १० मिनिटात कमावले ५ हजार रुपये

**मैसूर** - कर्नाटकच्या एका आमदाराने मैसूरमधील चहाच्या टपरीवर चहा विकून १० मिनिटात ५ हजार रुपये कमावले. चहावाल्यानेही कधी विचार केला नसेल की आपली एवढी कमाई होऊ शकते. आमदार महोदयांनी चहावाल्याला विक्रीचे ५ हजार रुपये तर दिलेच याशिवाय आपल्या खिशातून जास्तीचे १० हजार रुपये दिले.

जेडी (एस)चे बंडखोर आमदार जमीर अहमद एका रस्तेनिर्मितीच्या कार्याचं उद्घाटन करण्यासाठी गेले होते. उद्घाटनानंतर आमदार जमीर आपल्या सोबत असणारे आमदार वासू यांच्यासोबत मुश्लीम कोऑपरेटीव्ह बँक सर्कलच्या समोरील एका चहाच्या टपरीवर पोहोचले. टपरीवर पोहोचल्यानंतर जमीर यांनी स्वत: चहा विकण्यास सुरुवात केली. बघता बघता चहा खरेदी करण्यासाठी टपरीवर गर्दी झाली. आमदारांनी विकलेल्या चहाच्या एका कपसाठी अनेकांनी १००, २०० रुपये दिले. यामुळे आमदारांनी अवघ्या १० मिनिटात ५ हजार रुपये कमावले. जमीन यांनी टपरीच्या मालकाल ५ हजार आणि आपल्याजवळील १० हजार असे एकूण १५ हजार रुपये दिले.

## वडिलांसोबत अनैतिक संबंधाचा संशय आईकडून मुलीची हत्या!



**बेलापूर** - खारघरमध्ये राहणाऱ्या संतोषीदेवी सयानी या महिलेने १६ वर्षीय मुलीची गळा आवळून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मुलीचे तिच्या वडिलांसोबत अनैतिक संबंध असल्याचा संतोषीदेवी हिला संशय होता. त्यामुळे तिने मुलीची हत्या केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर खारघर पोलिसांनी संतोषीदेवीला बुधवारी अटक केली.

मृत मुलगी ही आई-वडील व लहान भावासह खारघर सेक्टर २९ मध्ये राहत होती. दहावीत असलेल्या या मुलीचे वडिलांसोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय तिच्या आईला होता. यावरून ती नेहमी मुलीला मारहाण करत असे. ही बाब त्या मुलीने वर्गमैत्रिणीला सांगितली होती. या छळाला कंटाळून काही दिवसांपूर्वी तिने इमारतीवरून उडी टाकून आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी तिने वडिलांच्या नावाने चिठ्ठी लिहून ती चिठ्ठी सुरक्षारक्षकाकडे दिली होती. सुरक्षारक्षकाने ही चिठ्ठी त्या मुलीच्या वडिलांऐवजी तिच्या लहान भावाकडे दिली. ती संतोषीदेवीच्या हातात पडल्यामुळे मुलीचा आत्महत्येचा प्रयत्न फसला होता.

मुलीची दहावीची परीक्षा सुरू असतानाच ४ मार्च रोजी संतोषीदेवी हिने मुलीचा गळा आवळून तिची हत्या केली. त्यानंतर मुलीने आत्महत्या केल्याची आवई उठवून आईने पोलिसांचीही दिशाभूल केली. मात्र, शवविच्छेदनाच्या अहवालात तिचा गळा आवळल्यामुळे मृत्यू झाल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी मुलीच्या मैत्रिणीकडे विचारपूस केल्यानंतर तिने तिची आई छळ करत असल्याची माहिती दिली. पोलिसांनी संतोषीदेवीला ताब्यात घेऊनचौकशी केली असता तिने हत्येची कबुली दिली.

## धान्य घोटाळयातील सर्वच दोषींविरुद्ध कारवाई होणार

### विधान परिषदेत सरकारचे आदेश

**परभणी-** जिल्ह्यातील ५ कोटी रुपयांच्या शासकीय धान्याच्या अपहारप्रकरणी २० अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध करण्यात आलेल्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव राज्य शासनास प्राप्त झाला असून त्या प्रस्तावाची छाननी सुरू आहे. चौकशीअंती सर्वच दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधान परिषदेत दिली.

आमदार बाबाजानी दुर्राणी, विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे व अन्य सदस्यांनी परभणी जिल्ह्यातील धान्य घोटाळ्यासंदर्भातील तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना राज्यमंत्री चव्हाण यांनीही माहिती दिली. जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या शासकीय धान्य गोदामाची तपासणी मुंबईच्या पुरवठा संचालनालयाच्या पथकाने केल्यानंतर शासकीय धान्याचा मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचे निर्दशनास आले होते. हा आकडा तब्बल ४ कोटी ९७ लाख ६९ हजार ९२९ रुपयांचा असल्याचे निदर्शनास आले होते. त्यात २० अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. या विभागीय चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. प्रस्तावाची छाननी सुरू असून त्याबाबतची अधिकची माहिती मागवण्यात आली आहे. चौकशीअंती दोषी अधिकारी व



कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे राज्यमंत्री चव्हाण यांनी सांगितले. जिल्ह्यातील धान्य घोटाळ्यातील जबाबदार वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांची चौकशी राज्य शासनाने सुरू केली होती. त्यावरून संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली. या प्रकरणात काही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हेही दाखल झालेले आहेत, तर काहींची चौकशी सुरू असल्याचे कारण दाखवीत त्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचा आरोप आमदार बाबाजानी यांनी विधान परिषदेत केला.

## अण्णांनी भेट नाकारली; भाजपाची डोकेदुखी वाढली



***नवी दिल्ली : शेतमालाला दीडपट भाव, लोकायुक्तांची नियुक्ती यांच्यासह अनेक मागण्यांसाठी दिल्लीत रामलीला मैदानावर आंदोलनास बसलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी, महाराष्ट्राचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांची भेट नाकारल्याने भाजपाची डोकेदुखी वाढली आहे. अण्णांची प्रकृती सातत्याने ढासळत असल्याने, केंद्र सरकारवर दबाव वाढला आहे.***

मागण्या मान्य झाल्याचे लेखी आश्वासन दिल्याशिवाय भेटायला येऊ नका, मी त्याशिवाय कुणाशीही चर्चा करणार नाही, असा स्पष्ट संदेश अण्णांनी महाजन यांना पाठविला आहे. त्यामुळे महाजन यांना रविवारी दिल्लीतच ताटकळत थांबावे लागले आहे.

भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने अण्णांची मनधरणी करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरच सोपविली आहे. दिल्लीतून भाजपाचा एकही नेता अण्णांशी चर्चा करणार नाही. फडणवीस यांनी त्यामुळेच महाजन यांना अण्णांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीत पाठविले. महाजन यांनी अण्णांना भेटीची वेळ मागितली, परंतु लेखी आश्वासन दिल्याशिवाय भेटू नका, असे सांगत अण्णांनी ती नाकारली. आवश्यक दस्तावेज घेऊन सोमवारी सकाळी ११ वाजता महाजन रामलीला मैदानावर अण्णांना भेटणार असल्याचे समजते.

अण्णांमुळे फडणवीस यांची कोंडी झाली आहे. अण्णांना दिल्लीत येण्यापासून परावृत्त करण्याची सूचना भाजपा अध्यक्ष अमित शहा यांनी मुख्यमंत्र्यांना केली होती, परंतु फडणवीस त्यात अपयशी ठरले.

## नितीन गडकरी देशाचे भावी पंतप्रधान – हार्दिक पटेल

**अकोला –** भाजपचे माजी अध्यक्ष आणि केंद्रिय मंत्री नितीन गडकरी पुढील पंतप्रधान असतील, असे भाकित गुजरातमधील पाटीदार समाजाचे युवा नेते हार्दिक पटेल यांनी वर्तवले आहे. हार्दिक पटेल विदर्भ युथ फोरमच्या एल्गार मेळाव्यात बोलत होते.

मोदींवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नाराज असल्याचे वक्तव्य पटेल यांनी केले. तसेच पुढील निवडणुकीत भाजपच्या जागा कमी व्हाव्यात अशीही संघाची इच्छा असल्याचे पटेल यांनी सांगितले. पुढच्या निवडणुकीत जर मोदींचीच चलती राहिली तर कायदे करुन त्यापुढे कधीच निवडणुका होणार नाहीत. अशी तजविज ते करतील, असेही भाकित त्यांनी केले. याउलट जर भाजप आणि एकूणच एनडीएला कमी जागा मिळाल्या तर मोदींना बाजूला करुन नितीन गडकरींना पंतप्रधान करणे संघाला सोपे होईल, असा अंदाजही त्यांनी वर्तवला.



राज्यातील काँग्रेस नेते या कार्यक्रमात उपस्थित होते. नागपूर ही आधी दीक्षाभूमी आहे. नंतर हवे तर त्याला संघभूमी म्हणता येईल, अशी खोचक टिप्पणीही पटेल यांनी केली. शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये, असे आवाहन करत त्यांच्या हक्कांसाठी आपण तुरुंगातही जायला तयार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.






हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)